# प्रस्तावना

शेतीचे नवे कायदे आले आहेत.

त्यांना विरोध होत आहे.

बातम्यांतून सारे काही नीट समजत नाही.

नक्की काय आहे या कायद्यांमध्ये?

ते सर्व अवघड आणि इंग्रजीमध्ये, ते कळणार तरी कसे?

माझ्याकडे शेती आहे, मला हे कसे कळेल?

समजून घ्यायचे आहे!

मग हे वाचा.

तुम्हाला सोपे करून मराठीत सांगण्याचा, फायदे काय, तोटे काय आणि धोका काय असू शकतो हे सांगण्याचा आमचा हा एक प्रयत्न आहे. यात या कायद्यांच्या बाजूने अथवा विरोधी अशी कोणतीही भूमिका नाही. हे कायदे असावेत किंवा नसावेत यावर आमचे मत नाही.

याचा तुम्हाला उपयोग झाला तर आमची मेहनत कामाला आली याचे समाधान वाटेल!

## शेतीसाठी ३ नवे कायदे

| अनु.क्र. | कायदा | प्रमुख हेतू |
|---|---|---|
| १. | शेतकरी (अधिकार व संरक्षण) करार, किंमत हमी व शेती सेवा कायदा सन २०२० | कंपनीबरोबर करार करता यावा व किंमत हमीसाठी |
| २. | शेतकरी शेतमाल व्यापार व विक्री (उत्तेजन व सुविधा) कायदा सन २०२० | थेट व्यापार व विक्री करता यावी यासाठी |
| ३. | अत्यावश्यक वस्तू (दुरूस्ती) कायदा सन २०२० | शेतमाल साठवून ठेवणे सोपे व्हावे यासाठी |

१) भाजप सरकारतर्फे ५ जून २०२० रोजी तीन वटहुकूम निघाले. १७ ऑगस्ट, ९ सप्टेंबर व ११ सप्टेंबर रोजी त्याचा कायदा होण्यासाठी ते लोकसभेसमोर आले. मंजूर झाले. १९/२० सप्टेंबर दरम्यान ते राज्यसभेसमोर आले. मंजूर झाले. २७/२८ सप्टेंबरच्या दरम्यान मा. राष्ट्रपती महोदय यांची सही/मंजूरी होऊन आता त्याचा कायदा झाला आहे.

**२) कायदा कधीपासून अंमलात येणार?**

दि. ५ जून २०२० या वटहुकूम निघाल्याच्या तारखेपासून. कारण कायद्याने वटहुकूम नियमित झाले आहेत.

**३) कायदे करण्यामागची भारत सरकारची भूमिका:-**

- शेती लहान तुकड्या-तुकड्यात विभागली गेल्याने सलग होत नाही
- शेतकऱ्याला शेती करताना प्रत्येक टप्प्यावर असणारा धोका कमी किंवा नाहीसा व्हावा.
- लहरी हवामानाला शेतकऱ्याला तोंड देता यावे.
- किती पिकेल व काय भावाने विकेल या चिंतेतून शेतकऱ्याला सोडविणे.
- किती खर्चाने आणि किती पिकणार या धोक्यामधून येणारी शेतकऱ्यांची निराशा टाळण्यासाठी.
- माफक खर्चात जास्त उत्पन्न मिळावे.

- शेतीमध्ये मोठ्या उद्योजनकांनी भांडवल गुंतवावे.
- दर्जेदार पीक तयार करून परदेशी विकता यावे.
- शेतकऱ्याला जादा आर्थिक फायदा मिळावा.
- शेतीचे उत्पन्न वाढावे.
- करोनाच्या संकटाशी शेतकऱ्याला सामना करता यावा.
- शेती संकटावरचा कायमस्वरूपी तोडगा.
- शेतीमधून देशाची आर्थिक शक्ती वाढावी.
- शेतकऱ्यांची शेती कराराने इतरांना करता यावी.
- शेतीसोबत शेतपीकांवरचे उद्योग करता यावे.
- शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाची योग्य किंमत मिळावी.
- पीक विक्रीच्या व्यवहार उघड व खरा-खरा व्हावा.
- कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जाचक अटी काढून टाकण्यासाठी.
- शेतकऱ्याला त्याचा शेतमाल त्याला हवे असणाऱ्या व्यापाऱ्याला विकता येण्यासाठी मुभा मिळणेसाठी.
- शेतमाल बाजारांची दुसरी पर्यायी व्यवस्था तयार करण्यासाठी.
- नव्या बाजारात पैशांची गुंतवणूक व्हावी.
- शेतमाल विक्रीमध्ये चढाओढ / स्पर्धा निर्माण होण्यासाठी.
- शेतीमालाची नवी पुरवठा साखळी तयार व्हावी.
- शेतीपूरक उद्योगांबरोबर शेतकरी थेट जोडला जावा.
- शेतमाल विकण्यासाठी येणारा खर्च कमी व्हावा.
- पीक तयार झाल्यावर येणारा तोटा कमी करता यावा.
- शेतकऱ्यांची मिळकत वाढावी.
- शेतमालाचे व्यवहार करताना कृषी उत्पन्न बाजार समिती आणि राज्य सरकारे यांचा अडसर दूर करण्यासाठी.
- कोणतीही अडवणूक न होता शेतमाल राज्यात सर्व ठिकाणी आणि एका राज्यातून दुसऱ्या राज्यात नेऊन कृषी उत्पन्न बाजार समिती सोडून इतर बाजारात विकता यावा.
- संगणकाव्दारे मालाची थेट विक्री करता यावी.
- नवीन काम-नोकऱ्या तयार व्हाव्यात.

- शेतमाल परदेशात विकला जावा व देशाला परदेशी चलन मिळावे.
- शेतमाल विकत घेणाऱ्या ग्राहकांच्या वाढत्या मागण्या व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी.
- जास्तीचे पीक-शेतमाल साठवून ठेवण्यांसाठी गोदामे व शितगृहे तयार करता यावीत.
- शेतमाल साठवून टिकवून ठेवता आला तर त्यातून शेतमालाला जास्त किंमत मिळावी.
- शेतीमालांवर प्रक्रिया करून तो परदेशी पाठवता यावा.
- शेतमाल साठविणे, एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठविणे आणि त्याची किंमत यावरील जाचक बंधने हटविण्यासाठी.
- गोदामे, शीतगृहे, प्रक्रिया, मालाची परदेशी पाठवण आणि विक्री यात खाजगी गुंतवणूकदारांनी त्यांची गुंतवणूक करावी यांसाठी त्यांना आकर्षित करण्यासाठी.

अशी लहान मोठी सुमारे ४० कारणे / हेतू समोर ठेवून ते पूर्ण करण्यासाठी हे तीन कायदे झाले आहेत.

४) **यातला महत्त्वाचा कायदा कोणता?**

तर आपली शेती कराराने करण्याचा पहिला कायदा.
आपली शेती कराराने दुसऱ्याने कसण्याचा.
आपले येणारे पीक आधीच विकता येणारा.
आपल्याला येणाऱ्या पिकाची किंमत हंगामाआधीच ठरवण्याचा.

५) **कोण-कुणाबरोबर करार करेल?**

एक पार्टी असेल शेतकरी / शेतमालक / मालधनी.
तर दुसरी पार्टी असेल मोठी कंपनी / शेतमालाचा धंदा करणारे / ठोक व्यापारी / शेतमाल परदेशांत विकणारे व्यापारी.

६) **यात शेतकऱ्याचा काय फायदा?**

माल धन्याला शेतमाल थेट विकता येईल.
पीक येण्याआधी किंमत ठरवता येईल,
व पीक येण्याआधीच पीक विकता पण येईल.
आपसात ठरले तर आगाऊ मोबदला मिळेल.

७) **किती प्रकाराने करार करता येईल?**

**पहिला प्रकारः-**

यात शेतकरी स्वत:चे शेत स्वत: कसेल.
मजूर लावले तर त्याचे तो लावेल.

मजुरी त्याची तो देईल.
पीक तयार होऊन हाती येईपर्यंत मालधनी शेतकरी असेल.
एका हाताने तो माल देईल. दुसऱ्या हाताने तो ठरलेली किंमत रोख/ बँकेव्दारे घेईल.
नंतर माल कंपनीचा होईल.
माल शेतकऱ्यांच्या दारातून उचलायचा का कंपनीला शेतकऱ्याने पोहोच करायचा हे करार करताना ठरवायचे आहे.
माल शेतकऱ्याच्या दारातून उचलायचा असेल तर तो योग्य वेळेला उचलण्याची कंपनीची जबाबदारी असेल.
माल शेतकऱ्याने कंपनीला त्यांचे दारात नेऊन घालायचा असेल तर वेळेत माल काटा करून घेण्याची कंपनीची जबाबदारी असेल.
या व्यवहारात आडत्या नाही. दलाल नाही.
आडत वजा होणार नाही. दलाली कापली जाणार नाही.

**दुसरा प्रकारः-**

यात शेती शेतकऱ्याची आहे.
पीक येण्यासाठी लागणारी सर्व सेवा, बियाणे, खते फवारणी, कापणी, काढणी इत्यादी कंपनी करेल. त्याचा खर्च पैसा कंपनी पुरवेल. शेतमजूर कंपनी पुरवील. मंजूरी कंपनी देईल.

**पीक किती निघेल? उत्पन्न किती येईल?**

याचा धोका कंपनी त्यांच्या अंगावर घेईल. यातली काही कामे शेतकरी जमीन मालकाने स्वत: केली तर त्याने केलेल्या / करावयाच्या कामासाठी त्याला काय वेगळी मजूरी / मेहनताना द्यायचा हे कंपनीबरोबर आधी ठरवता येईल. यासाठी कंपनी शेतकऱ्याला येणाऱ्या मालाची ठोक/ एकमुठी / किंमत देईल / काही भाग उचल /अंगावर देखील देईल.

**तिसरा प्रकारः-**

पहिला प्रकारातले थोडेसे व दुसऱ्यातले थोडेसे असे दोन्ही पार्टीमध्ये ठरेल त्याप्रमाणे-

८) **कसा असेल करार?**

करार लेखी असेल.

कराराची सरकारकडे नोंदणी होईल.

९) **शेतकरी व कंपनी यांच्या करारात अजून कोणी असेल?**

होय. दोघांनी घेतला तर तिसरा भागीदार येईल. उदा. खते पुरवणारा/ मजूर पुरवणारा / बियाणे पुरवणारा.

१०) **काय काय असेल करारात?**

कोणत्या दर्जाचा शेतमाल / पीक तयार करायचे हे आगावू लिहिलेले असेल.

११) **शेतमाल म्हणजे काय?**

गहू, ज्वारी, तांदूळ, सर्व प्रकारची धान्य, तेल, तेलबिया, भाजीपाला, तृणधान्य, मसाल्याचे सर्व पदार्थ, ऊस, कोंबडी पालन, डुक्कर पालन, शेती-बकरी-मेंढी पालन, मासळीपालन, गुरांचा चारा, कापूस, सरकी, कच्चा ताग,

१२) **शेतमालाचा दर्जा कसा ठरवणार?**

दर्जा, गुणवत्ता, प्रमाण हे आधीपासून दोघात ठरणार.

१३) **पण हे कसे ठरणार? कोण ठरवणार?**

**तयार पीक, तयार माल ऐनवेळी कंपनीने नाकारला तर?**

असे होऊ नये म्हणून दोघांशीही संबंध नसणारे तिऱ्हाईत मालाचा दर्जा ठरवणारे तज्ञ इसम-ग्रेडर असतील. ते ठरवतील. त्यांचा निर्णय दोघांना मान्य करावा लागेल. माल स्वीकारल्यावर नंतर कंपनीला तक्रार करता येणार नाही.

१४) **काय दराने कंपनी शेतकऱ्याचा माल घेईल?**

दोघांमध्ये करार करताना दर आधी लेखी ठरेल. दरात तफावत होत असेल तर किमान हमी किंमत / गॅरंटी प्राईस आधी ठरवून लिहावी लागेल. त्याहून जादा किती देणार हे पण आधी लिहावे लागले. जास्त चांगला माल तयार झाला तर सर्वात जास्त किंमत

किती देणार हे आधी लिहून ठेवावे लागेल. बोनस किती देणार हे देखील करारात लिहावे लागेल.

**१५) दर ठरविण्यासाठी कशाचा आधार घेणार?**

कृषी उत्पन्न बाजार समितीतत चालू असणारा भाव. बाजारभाव. संगणकावर दाखवत असलेला जागतिक / तुमच्या देशातला बाजारभाव.

**१६) शेतकऱ्याला पैसे किंमत मिळायला उशीर होईल का?**

एकीकडे माल दुसरीकडे लगेच रोख रक्कम असा व्यवहार करायचा आहे. जास्तीत जास्त मुदत ३ दिवसांची आहे. तेलबियांची किंमत २/३ मालासमोर द्यायची आहे. राहिलेली १/३ ३० दिवसात दर्जा ठरवून त्याप्रमाणे हिशोब करून द्यायची आहे.

**१७) पैसे कसे द्यायचे? किंमत कशी घ्यायची? मोबदला कसा मिळणार? हे कोण ठरवणार? यावर नियंत्रण कोणाचे? कंट्रोल कोणाचा?**

राज्य सरकार याबाबतचे सर्व नियम तयार करेल.

**१८) प्रत्येक शेतकऱ्याने कराराने शेती केली पाहिजे काय? सक्ती होणार काय?**

नाही. शेतकरी ठरवणार करार करायचा का नाही ते.

**१९) आणि शेतकऱ्याची शेती त्याचे कुळ कसत असेल तर?**

कुळाचे हक्क डावलून शेतकरी व कंपनी करार करू शकणार नाहीत. केला तर तो कायदेशीर नाही. कुळाला सोबत घेऊन शेतकरी-कुळ व कंपनी असा तिघांचा एकत्र करार करावा लागेल. त्यात कुळाचा हिस्सा व शेतकऱ्याचा हिस्सा लिहावा लागेल.

**२०) किती मुदतीचा करार असेल?**

एक पीक जेवढ्या मुदतीत येते तेवढ्या मुदतीचा लहानसा करार देखील करता येईल. कोंबडी, डुक्कर, शेळी, मेंढी, बकरी, मासळी पालन, जीव जन्माला येऊन बाजारात विकायला जायला जेवढा

वेळ लागतो तेवढ्या मुदतीचाही करार करता येईल. जास्तीत जास्त मुदत मात्र असेल ५ वर्षे.

२१) **त्यापेक्षा जास्त मुदतीचा करार करता येईल?**

होय. दोघांत ठरवून करता येईल. काही वेळा पीक / उत्पन्न ५ वर्षांपेक्षा जास्त काळाने मिळते त्यावेळी म्हणजे उदा. आंबा, नारळ, साग इत्यादी.

याशिवाय पहिली ५ वर्षे संपल्यावर १ दिवस उलटल्यावर दोघांनी नवा ५ वर्षापर्यंत करार करण्याची मोकळीक राहील. पहिल्या करारात देखील पुन्हा करार करायचा किंवा नाही हे आगावू लिहिता येईल.

२२) **फळबागा व झाडे–मुदत संपल्यावर मालकी कोणाची?**

फळशेती ही अनेकदा ५ वर्षांपेक्षा जास्त काळाच्या कराराने करावी लागणार आहे. मुदत संपल्यावर झाडे कोणाच्या मालकीची असतील? कंपनी त्यावर मालकी सांगेल?

पण असे नाही. करार पीक विक्रीचा आहे. झाडे ही शेतकऱ्याचीच असतील. मात्र कायदा या मुद्यावर मोघम आहे. करारात नीट लिहावे लागेल.

२३) **करार करण्याची जबाबदारी कोणाची?**

कंपनीची. लेखी करार कंपनीने करून द्यायाचा आहे.

२४) **प्रत्यक्ष कसा असेल करार? काय मजकूर असेल त्यात?**

भारत सरकार या कायद्याखालचे नियम आता तयार करणार आहे.
त्यात उत्तम कराराचा नमुना ते छापणार आहेत.
त्याचा आधार दोघांनी घ्यायचा आहे.
गरजेप्रमाणे ठरवून योग्य ते बदल होतील.

२५) **कराराची नोंद होईल?**

होय, संगणकाने सरकारकडे प्रत्येक करार नोंदवायचा आहे.

२६) **नोंद करण्यासाठी पैसे लागतील? किती? कोण देणार?**

नियम तयार होतील, त्यात नोंदणीसाठी किती पैसे लागणार हे ठरेल. कायद्याने नोंदणीसाठी लागणारे पैसे कंपनी देणार आहे.

**२७) विमा काढता येईल का?**

होय, शेतकरी-कंपनी दोघांनाही मिळेल. करार करतानाच करारात विमा कंपनीला देखील सामील करून घेता येईल.

**२८) जमीनीत कंपनीला बांधकाम करता येईल?**

होय. करारात तसे आधी लिहावे लागेल. शेतीला पूरक बांधकाम करता येईल. कराराची सर्वसाधारण जास्तीत जास्त मुदत ५ वर्षे आहे. मुदत संपल्यावर कंपनीला बांधकाम काढून टाकून जमीन पूर्वी जशी होती तशी करून द्यावी लागेल. बांधकाम काढले नाही तर शेतकरी अशा बांधकामाचा आपोआप मालक होईल. त्याची वेगळी किंमत त्याला कंपनीला मोजावी लागणार नाही.

**२९) शेतीतले बांधकाम कंपनीने पाडले नाहीतर?**

करार संपल्यानंतर कंपनी काढता पाय घेईल. कंपनीने बांधकाम पाडून त्याखालची सर्व जागा परत शेती करता येण्यासारखी करून देण्याची जबाबदारी कायद्याने कंपनीवर टाकलेली आहे. कंपनीने असे केले नाही तर हे बांधकाम आपोआप शेतकऱ्याच्या मालकीचे होईल. मोठ्या बांधकामाचे शेतकरी काय करेल? बांधकाम नको असेल तर ते पाडायचा खर्च शेतकऱ्याच्या अंगावर पडू शकतो. यासाठी करार नीट करून घ्यावा लागेल. नाहीतर नंतर यातून तंटा होवू शकतो.

**३०) शेताच्या हद्दीचे बांध राहतील काय?**

शेतकऱ्याला करारात तसे स्पष्ट कंपनीकडून आधी लेखी लिहून घ्यावे लागेल. अनेक शेतकऱ्यांची शेती कराराने घेऊन, ती सलग एकत्र यंत्राव्दारे करणे कंपनीला व कायद्याला अपेक्षित आहे.

मात्र कंपनीने बांध मोडले तर कराराची मुदत संपल्यावर स्वत:च्या खर्चाने कंपनीने ते पहिल्यासारखे करून देण्याची जबाबदारी कायद्याने कंपनीवर टाकली आहे.

**३१) करार संपल्यानंतर सलग एकत्र केलेल्या जमिनीतील आमच्या जमीनी परत पहिल्यासारख्या होतील? हद्दीच्या बांधाचे काय?**

कायद्यात जमीन पूर्ववत करून देण्याची जबाबदारी कंपनीवर टाकलेली आहे. सलग एकत्र शेतीमध्ये परत सर्वांच्या हद्दीचे

पहिल्यासारखे करून देणे हे एक अवघड काम आहे. त्यासाठी करार नीट लिहून, तपासून पारखून घ्यावा लागेल. करार करतांना त्यास जमीनीचे नकाशे जोडावे लागतील. कंपनीने नवीन मार्गाने नकाशांची खात्री करावी लागेल. करार संपल्यावर जमीन तशीच सोडून कंपनी काढता पाय घेणार नाही याची काळजी ज्यांची ज्यांची जमीन कंपनीने सलग एकत्र केलेली आहे त्या शेतकऱ्यांना घ्यावी लागेल. यातला धोका शेतकऱ्याला पत्करावा लागेल.

**३२) करार मुदतीआधी रद्द करता येईल काय?**

होय. शेतकऱ्याला हवे असेल तर. कंपनीला हवे असेल तर. दोघांच्या संमतीने. एक जण जरी नाही म्हटला तर नाही.

**३३) कंपनी जमीन बळकावेल काय?**

नाही. कराराच्या पहिल्या प्रकारात जमीनीचा ताबा शेतकऱ्याकडेच आहे. दुसऱ्या प्रकारचा करार शेतकऱ्याने काळजीपूर्वक करावा लागेल. कंपनीचे मजूर घातले तरी ताबा शेतकऱ्याचा राहील हे लिहावे लागेल. अनेक शेततकऱ्याची शेती सलग व एकत्र झाली व यंत्राने होऊ लागली तर असे लिहिणे हे कागदावर राहील.

मात्र कराराचे निमित्त करून कंपनीला जमीन मुदत कराराने घेता येणार नाही. खरेदी घेता येणार नाही. गहाण ठेवता येणार नाही. कोणत्याही कारणाने शेतकऱ्याच्या जमीनीवर, शेत घरावर कंपनीला जप्ती आणता येणार नाही.

**३४) करार त्यातील कलमे, किंमत, पैसे, मोबदला, जमीन सोडणे, न सोडणे या सारख्या कोणत्याही कारणांनी कंपनीबरोबर वाद झाला तर कोणाकडे दाद मागायची? कोर्टात?**

वाद मध्यस्थांच्या मार्फत सोडवायचा पहिला प्रयत्न करायचा आहे. मध्यस्थांचे एक मंडळ असेल. त्यात शेतकरी व कंपनी दोघांचेही प्रतिनिधी असतील. ३० दिवसांची मुदत राहील.

शेती उत्पादन संस्था व शेती सेवा पुरवठादार मध्यस्थ म्हणून काम करू शकतील.

**३५) नाही झाली मध्यस्थी तर?**

प्रांतसाहेबांसमोर तक्रार द्याची आहे. त्यांनी दोघांचे म्हणणे ऐकून ३० दिवसात निकाल द्यायचा आहे.

कंपनीने शेतकऱ्याचे पैसे दिले नसतील तर मूळ रक्कम त्यावर व्याज व मूळ रकमेच्या दिडपट (१०० ला १५०) असा दंड कंपनीला द्यावा लागेल.

मात्र कंपनीचे शेतकऱ्याकडे देणे निघाले तर शेतकऱ्याने मात्र केवळ देणे लागणारी रक्कम द्यायची आहे. त्यावर व्याज नाही. दंड नाही.

**३६) प्रातांचा निकाल कबूल नसेल तर?**

जिल्हाधिकारी / कलेक्टर साहेब यांचेकडे अपील करता येईल.

**३७) कोर्टात जाता येईल?**

नाही. तुमच्या गावी असणाऱ्या किंवा जिल्ह्याच्य ठिकाणी असणाऱ्या कोर्टात जाता येणार नाही.

**३८) आणि कलेक्टर साहेबांकडून न्याय झाला नाही असे वाटले तर काय करायचे?**

पहिली तक्रार प्रांत यांचेकडे.

त्यावर अपील कलेक्टर यांचेकडे.

त्यावर दुसऱ्यांदा अपिलाची तरतूद कायद्यात नाही.

मात्र मुंबईचे उच्च न्यायालयात दाद मागता येते. त्याच्या वरचे सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे आहे. तो दरवाजा ठोठावून न्याय मागता येतो.

**३९) कृषी उत्पन्न बाजार समिती / मार्केट कमिटी/ दलाल-आडते आम्हाला माल विकू देतील काय?**

राज्य सरकार समितीला माल विका असे सांगेल काय?

शेतकरी-कंपनी असा करार झाल्यावर त्याला बाजार समितीचा कायदा लागणार नाही. राज्य सरकार तसे सांगू शकणार नाही. दलाल आडते आडवे पडू शकणार नाहीत. माल साठवता येईल. कुठेही नेवून विकता येईल.

**४०) माल साठविण्यावर मर्यादा आहे का?**

करार केला तर कराराने शेती करणारांना नाही. मात्र फळभाज्यात १००% भाववाढ झाली तर किंवा इतर सामान ५०% भाववाढ झाली तर सरकार साठा करण्यावर बंधन घालेल.

**४१) काय साठवता येईल?**

सर्व धान्ये, सर्व डाळी, सर्व तेलबिया, कांदे, बटाटे.

**४२) करार कधी मोडित काढता येईल?**

करार कधी मोडीत निघेल? कधी लागू पडणार नाही.

युध्दजन्य परिस्थिती, पूर, दुष्काळ, खराब हवामान, रोगराई, साथीचे रोग, पिकांवरील साथीचे रोग-किड, पीकांवरील औषधांचा दुष्परिणाम, शेतकरी किंवा कंपनी यांच्या आवाक्याबाहेरील बाबी.

**४३) शेतकरी नसणारा आता शेती करू शकेल?**

होय. करारात शेतकरी व कंपनी यांचेसोबत करारात सामील होऊन. तिसरा भागीदार म्हणून.

**४४) शेतमाल दर्जा ठरवणारे ग्रेडर कोण लागून गेले?**

करार केल्यावर असे म्हणून चालणार नाही. शेतमाल दर्जा ठरविणारे ग्रेडर हे कृषीतज्ञही असतील. माल कसा? पीक कसे? कापसाच्या ग्रेडप्रमाणे राहील. A B C अ ब क एक नंबर, दोन नंबर, तीन नंबर, टाकावू-बाद माल, असे ठरेल.

**४५) शेतकऱ्याच्या शेतीवर पीक पाण्याची नोंद कोणाची राहील?**

पहिल्या प्रकारच्या करारात ती शेतकऱ्याची राहील.

दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारच्या करारात कंपनीच्या नावाची नोंद होण्याची शक्यता जास्त आहे.

**४६) खरोखर शेतकरी कराराने शेती न करण्याचे स्वातंत्र्य घेऊ शकेल?**

याचे उत्तर येणारा काळ देणार आहे.

माझी शेती मी कसणार असे एकजण म्हणणार आहे. त्याचे चारी बांधकरी कंपनीला कराराने शेती देणार असे झाले की कंपनीला

हवी असणाऱ्या सलग-सपाट यंत्र शेतीला अडथळा होईल. रस्त्याचे हक्क, शेतगाडी, ट्रक्टर याच्या वाट-वहिवाटीचे प्रश्न येतील. ज्यांना हद्दी माहित नाहीत असे कंपनीचे लोक येतील. त्यात स्वत: शेती करणारांस जमीन धरून टिकून रहावे लागेल.

**४७) मृत्युनंतर करार टिकेल?**

होय. सरकारकडे नोंदलेला करार आहे. शेतकऱ्याच्या पत्नी-मुला बाळांवर व वाली वारसांवर करार बंधनकारक राहील. वारस करारास बाधील राहतील.

**४८) हमीभाव सरकार देईल काय?**

नाही. करार कंपनीबरोबर आहे. किमान हमीभाव शेतकऱ्याने कंपनीसोबत ठरवायचा आहे. सरकारचा यात काही संबंध रहात नाही.

**४९) बाजार समिती टिकेल का नाही?**

जे कराराने शेती करणार आहेत त्यांचा माल कंपनीने आधीच विकत घेतलेला आहे. जे स्वत:ची शेती स्वत: करणार ते बाजार समितीला माल विकणार.

किती शेतकरी कंपनीबरोबर शेती करतात व किती जण यापुढे स्वत: कसतात याबार बाजार समिती जिवंत राहील किंवा नाही हे येणारा काळ ठरवेल. आजच्या एवढी शक्तिमान मात्र राहणार नाही.

**५०) शेतीवर पूर्वीचे कर्ज असेल, बँक, सोसायटी असेल, बोजा असेल तर काय?**

करारानंतर कंपनीकडून पीकाची किंमत म्हणून तसेच आगाऊ पैसे देणार त्यातून शेतकऱ्याला पूर्वीचे कर्ज, बँक, सोसायटी, बोजा भागवावा लागेल.

**५१) शेतीच्या व्यवहारातील दलाली संपेल?**

करारच्या शेतीत मार्केट कमिटी मधल्या दलाल-अडत्यांना काही स्थान नाही. तुम्ही शेती कराराने करण्यास द्यावे असे शेतकऱ्याला पटवणारे नवे कंपनीचे दलाल निर्माण होतील. ते सुटाबुटातील

असतील असे नाही. तुमच्या गावातील आजूबाजूचे असतील. ते गोड बोलतील. दलालांची परंपरा फार जुनी आहे. शेती शेतकऱ्याची आहे. ती कराराने द्यायची किंवा स्वत: कसायची हा निर्णय त्याने स्वत: कोणाच्या भुलथापांना बळी न पडता घ्यायचचा आहे. शेतकऱ्यांच्या संस्था, संघटना व शेती सेवा देणारे हे देखील नवीन दलाल असू शकतात.

५२) **करार कसा असेल ते कळेल का?**

कंपनी व वकिल यांना इंग्रजी भाषा सोयीची असते. वकिलांची कोणतीही भाषा अवघड असते. शेतकऱ्याने त्याला कळणाऱ्या भाषेचा आग्रह धरला पाहिजे. कराराचा मसुदा तुमच्याकडे ठेवून घ्या. आधी वाचा. समजून घ्या. न वाचता न कळता सही/अंगठा करू नका. समजले नसेल तर समजले आहे असे म्हणू नका. बरोबर नसले तर बरोबर आहे असे म्हणू नका. सही करताना मला समजले नव्हते हे नंतर शक्तिमान कंपनीसमोर टिकणार नाही.

५३) **सध्या माझ्या भावा बहिर्णींची नावे आहेत पण शेती माझेकडे आहे-कंपनीबरोबर करार मला एकट्याला करता येईल काय? सर्व शेती मी कंपनीला कराराने देऊ शकेन काय? सगळे पैसे मला मिळतील काय?**

नाही. जमीन मालक सर्व खातेदार आहेत. कराराला सगळे लागणार. उत्पन्न/ मालाची रक्कम सर्वात वाटली जाईल.

५४) **भांडवला अभावी शेती नीट होत नाही. कंपनी भांडवल घालेल काय?**

होय. दुसऱ्या प्रकारच्या करारात कंपनी स्वत:चे भांडवल घालेल. एकत्र सलग शेती करून जादा उत्पन्न व जादा नफा कमावणे यासाठी कंपनी तुमची शेती कसणार व करणार आहे.
भांडवल / पैसा स्वत:चे नियम घेऊन येईल.

५५) **कंपनीला आमची शेती का पाहिजे? आमची शेती आम्ही करू. कंपनीला पाहिजे तर कंपनीने स्वत:ची शेती घ्यावी. भांडवल घालावे. उत्पन्न घ्यावे.**

- शेतकऱ्याची शेती शेतकऱ्याला विकावी लागते व शेतकरीच विकत घेतो. कंपनी शेतकरी नाही. त्यामुळे कंपनीला तुमची शेती खरेदी करता येत नाही. आजतरी कंपनीला तुमची शेती खरेदी करायची नाही. तुमच्याकडे शेती आहे, भांडवल नाही. आहे ते भांडवल कमी पडते. नवी पध्दत नाही. हत्यारे नाहीत. मजूर नाहीत.

  कंपनीकडे शेती नाही. पण भांडवल आहे. नवी पध्दत आहे. नवीन अवजारे आहेत. मजूर आणण्याची ताकद आहे.

  म्हणून तुमची शेती व जोडीला कंपनी घ्या आणि दोघे मिळून फायदा कमवा असे नवा कायदा तुम्हाला सूचवतोय. खुणावतोय.

**५६) कंपनी भारतीय असेल की परदेशी?**

- दोन्ही. भरतीय असेल. परेदशी असेल. भारतीय व परदेशी अशा दोन व अनेक कंपन्या एकत्र येऊन अजून एक नवी कंपनी खास शेती करण्यासाठी बनवतील.
- कोणाची असेल.

  कंपनीचे भागधारक अनेक असतील. ते मालक असतील. जगातले कुठलेही असतील.

**५७) आमची शेती करणे कायमचे बंद होईल?**

- तुमच्यावर -शेतकऱ्यावर अवलंबून आहे.
- दुसऱ्या प्रकारच्या करार ५-५ वर्षे कितीही वाढवता येईल. मजूर कंपनीचे, भांडवल कंपनीचे, बियाणे, खते कंपनीची व शेती तुमची.
- यात तुम्ही रानात जाण्याचा प्रश्न येत नाही. "सलग एकत्र शेतीत" तुमचे वावर कोणते ते डोळ्यांनी कळणार नाही. क्षेत्र कागदावर ७/१२ वर बरोबर राहील. कंपनीकडून तुम्हाला एक हमखास उत्पन्न मिळत राहील. अशी तुम्हाला सोडायची असेल तर तुमची शेती सुटू शकते.

५८) **मग आम्ही करायचे?**

- तुम्हीच तर म्हणत होतात की शेतीचा धंदा तोट्यात आहे. परवडत नाही. वाडवडिलांकडून आले आहे. तेच करतोय. कुठे जाता येत नाही. शेतीबरोबर बांधला गेलोय.

५९) **पण मला तर शेतीची कामे सोडून दुसरे काही येत नाही, मग करायचे काय?**

आता दुसऱ्या-तिसऱ्या प्रकारच्या करारात सर्व कष्टांसह भांडवलासह कंपनी तुमची शेती करणार आहे. तुम्हाला एकठोक पैसा, नफ्यात हिस्सा आणि बोनस पण देणार आहे.

तुमच्या आवडीचे दुसरे काही करायची आता तुम्हाला मोकळिक आहे. तुम्ही उचलून दुसरीकडे जाऊ शकता. नवीन काही कामधंदा शिकू शकता, करू शकता. खूप नफा मिळाला तर बसून खावू शकता.

६०) **मी आज मालक आहे? उद्या नोकर होईन?**

पहिल्या प्रकारच्या करारात तुम्ही मालकच आहात. तुम्ही शेती स्वत:च कसणार आहात.

दुसऱ्या तिसऱ्या प्रकारात तुमची शेती कंपनी त्यांच्या मजूरांकडून सलग एकत्र शेती करेल. तुमची गरज असेल तुमच्याकडे एखादी वेगळी कला असेल उदा- ट्रॅक्टर चालविणे, तर तुमची सेवा कंपनी घेऊ शकेल. शेतीचा मोबदला वेगळा. ट्रॅक्टर चालविण्याचा पगार वेगळा. तुमचा दुहेरी फायदा आहे. मालक नोकर मानण्यावर आहे. करार संपला की जमीन परत तुम्हीच कसणार आहात. आता तुम्ही ठरवा.

६१) **माझा माझ्या शेतात पिकलेला माल परदेशी जाईल?**

आज एकट्या शेतकऱ्याची स्वत: शेती करणाराची, लहान शेतकऱ्याची ती कुवत नाही. दर्जा, प्रत, गुणवत्ता, प्रमाण दाखला यातले काही जमत नाही. परदेशी माल पाठविण्याचे अनेक नियम आहेत. धोका आहे. विमा आहे.

मोठा श्रीमंत शेतकरी एकटा अथवा गटागटाने हे थोड्या प्रमाणात आज करतो आहे. त्याचे तंत्र त्यांनी शिकून घेतले आहे.

तुम्ही कंपनी बरोबर तुमची शेती कराराने कराल तेव्हा त्या कंपनीकडे जगाच्या बाजारात चालणारा शेतमाल बनविण्याचे आधुनिक तंत्रज्ञान, दर्जा, प्रतवारी, गुणवत्ता, प्रमाण दाखला, विमाकवच, धोका, नुकसान पचवण्याची ताकद सर्व असणार आहे.

होय. त्यामुळे तुमच्या वावरात पिकलेला शेतमाल परदेशी बाजारात जाईल. नफा झाला ततर त्याचा काही भाग तुम्हाला मिळण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे.

मोठी गोदामे व मोठी शीतगृहे बांधून भाव येईतो कंपनी माल साठवून टिकवू शकेल. ही पण जमेची बाजू आहे.

**६२) कराराच्या शेतीचा धंदा कंपनी दुसऱ्या कंपनीला विकू शकेल काय?**

त्याच कंपनीने करार पूर्ण होईतो तुमची शेती करायची आहे. होत नसेल तर करार रद्द करायचा असे लिहावे लागणार आहे.

नाहीतर, होय, कंपनी कराराने मिळणारे हक्क परस्पर दुसऱ्या कंपनीला विकेल. तुम्हाला नंतर भांडण काढावे लागेल.

**६३) कराराला बँका का जोडायच्या?**

कंपनी शेती करण्यासाठी बँकाकडून पैसा उचलणार. कंपनी व बँक यांच्या कराराला शेतकरी जोडणे चुकीचे आहे. बँकेने कंपनीला दिलेल्या कर्जाचा भार नंतर कंपनीने बँकेचे कर्ज फेडले नाही तर शेतकऱ्याच्या शेतीवर येणार नाही यासाठी करारला बँक जोडण्याला एकतर शेतकरी हरकत घेऊ शकेल. हा काळजीचा भाग आहे.

**६४) काय करावे मग? द्यावी का शेती कंपनीला कराराने?**

पहिल्या प्रकारात धोका नाही. तुम्ही मालक, ताबा तुमचा, कसणार तुम्ही, माल तयार झाला की विकणार.

दुसरा तिसरा प्रकार ठराविक काळासाठी एक पीक, दोन पिके, एक साल, दोन साल करार करून तुम्ही अनुभव घ्या. मग ठरवा, हे बरे की पहिलेच बरे.

सर्व शेती एकदम देण्यापेक्षा काही भाग कराराने शेती करा. बाकीची जुन्या पध्दतीने करा. तुलना करा. जास्त फायदा किंवा कमी नुकसान कशात आहे ते. मग ठरवा.
दुसऱ्या तिसऱ्या प्रकारच्या करारातूनन सलग एकत्र शेतीचा प्रयोग होणार आहे. दुसरीकडे होऊ द्या. तेथे गटा गटाने जाऊन पाहता येईल. तिथल्या शेतमालकाशी बोला. त्यांच्या अनुभवातून तुम्ही शिका. मग ठरवा. गडबड कंपनीला असेल. तुम्ही दम धरून निर्णय घ्या.

**६५) गाव काय करेल?**

गाव करेल ते राव करेल काय? असे आपण म्हणतो. कंपनी व करार शेती नको असेल तर ग्रामसभा तसा निर्णय करण्यास मोकळी आहे. ग्रामसभा व ग्रामस्वराज हे आपल्याकडे आहेच की. सर्वजण एकत्र बसा. एक विचाराने निर्णय घ्या.

**६६) आम्हीच करतो की मग एकत्र शेती? कशाला पाहिजे कंपनी?**

–सामुदायिक शेतीचे काही प्रयोग यापूर्वी झाले आहेत. भांडवल, तंत्रज्ञान, एकजूट हे काही जमले नाही. अजून करून बघा. कंपनी हा पर्याय आहे. त्यांचेकडे सर्व आहे असे ते सांगत येत आहेत. त्यांचे पण करून बघा.

**६७) कराराच्या पहिल्या प्रकारात माल घेतला नाही तर?**

दर्जा, प्रत, गुणवत्ता या कारणावरून दर बदलेल. मालही घेणार नाहीत. मग करार मोडीत काढायचा का? तुम्ही ठरवा. बाजार समितीला माल विका.

**६८) मग परत आमच्या नशीबी प्रांत, कलेक्टर ऑफिसच्या चकरा राहणार काय?**

कंपनीने माल नाकारला, दर कमी दिला, पैसे, पट्टी थकविली तर मध्यस्थ मंडळ, प्रांत, कलेक्टर अशी टप्प्याने दाद मागता येणार आहे. थकविलेल्या रकमेवर व्याज व १५०% दंड राहणार आहे.
सरकारी अधिकारी समन्वयाने वगातील व शेतकऱ्याचे हित पाहतील हे कायद्याला अपेक्षित आहे.
सध्या यावर विश्वास ठेवला पाहिजे.

**६९) पण “दादा” तर म्हणतातत की आपल्याकडे हे कायदे लागणार नाहीत असा निर्णय आम्ही घेऊ! खरं आहे काय?**

शेती हा संपूर्णपणे राज्य सरकारच्या अखत्यारितला विषय आहे. शेतीविषयक कायदे करण्याचा पहिला अधिकार राज्याचा आहे. असतो. राज्याच्या मागणीवरून केंद्र सरकार असा कायदा करू शकते. राज्यांनी अशी मागणी केलली नव्हती. पण ही कुस्ती अजून लागायची आहे. लागली तर ती दिल्ली पर्यंत जाणार आहे. हे ठरायला अजून काही काळ लागेल.

**७०) टिकणार का कायदे कोर्टात?**

राज्यांच्या अधिकारांवर केंद्रांच्या मर्यादा ह्या मुद्यावरून या कायद्यांना न्यायालयात आव्हान मिळेल. केंद्र सरकार, सर्व राज्य सरकारे त्यात आपली बाजू मांडतील. कंपन्याही त्यात उतरणार. एक शेतकरी एकटा बाजूने अथवा विरूध्द अशा खटल्यात आपली बाजू मांडू शकतो. त्यांच्या संघटना आल्या. तेथे ठरेल.

कंपन्या हा खेळ खेळायला येत आहेत. खेळाचा नियम नफा. नफा नाही मिळाला तर केंद्र सरकार व कायदा काहीही म्हणाला तर कंपन्या हो खेळ सोडून निघून जातील. सध्या तरी डाव शेतकऱ्याकडे आला आहे. त्याने तो विचाराने खेळायचा आहे.

**ॲड. उल्हास देसाई, ॲड. मुकुंद ननवरे व ॲड. विठ्ठल कुलकर्णी.**

लेखक परिचय:- शिवाजीनगर, पुणे येथील न्यायालयात गेले ४१ वर्षे वकिलीचा अनुभव.

टीप:- वरील सर्व मराठी मजकुराची जबाबदारी लेखकांची आहे लेखन स्वामित्व हक्क राखीव ठेवलेले नाहीत. यातील मजकूर कोणीही त्यांचे स्वत:चे जबाबदारीवर अनुवादीत करू शकतो. अनुवादीत मजकूराची जबाबदारी लेखकांवर नाही. यामागे जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत हे पोहोचावे व त्यांनी हे वाचावे हा हेतू आहे.

ukdesai23@gmail.com
nanawaremr@gmail.com
vgkulkarniadv@gmail.com